# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २३३-२२** **दिनांक ३१/०७/२०२२**

## स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राष्ट्रध्वज घेवून ७५ किलोमीटर धावले मि भा व वि आयुक्तालय पोलीस.

मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे वतीने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी (आजादी का अमृत महोत्सव) वर्षानिमित्त विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. 'आझादी का अमृत महोत्सव दौड' व 'हर घर तिरंगा' या कार्यक्रमास प्रोत्साहित करणाच्या अनुषंगाने आयुक्तालयात दिनांक ३१/०७/२०२२ रोजी ७५ पोलीस जवान प्रत्येकी १ किलोमीटर राष्ट्रध्वज घेऊन ७५ किलोमीटर तिरंगा रॅली रन पूर्ण केला आहे. सदर 'तिरंगा रॅली रन' उत्तन पोलीस ठाणे व वसई पोलीस ठाणे या दोन ठिकाणावरून सकाळी ०६.०० वाजता सुरु करण्यात आला होता व शेवटचे ठिकाण अप्पा ग्राउंड, नवजीवन फाटा, वसई पुर्व येथे एकूण ७५ किलोमीटर रन पूर्ण करून एकत्र आले. या दौड मध्ये मा. पोलीस आयुक्त श्री. सदानंद दाते, पोलीस उप आयुक्त श्री. विजयकांत सागर, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. विनायक नरळे, श्री. पंकज शिरसाट व इतर पोलीस अधिकारी/ अंमलदार यांनी सहभाग घेतला होता.

सदर तिरंगा रॅली रनचा मार्ग भूत बंगला पोलीस चौकी उत्तन- फातिमा माता मंदिर- शिवनेरी बस स्टॉप- परशुराम चौक -गोल्डन नेस्ट- सीताराम चौक- सृष्टी चौक सिग्नल- डेल्टा गार्डन चौक- काशिमिरा नाका- घोडबंदर खिंड- काठीयावाडी हॉटेल- रॉयल गार्डन- बापाने ब्रिज -सातिवली खिंड -तुंगारेश्वर ब्रिज व अप्पा ग्राउंड असे होते. तसेच वसई पोलीस ठाणे येथून सुरु झालेल्या शर्यतीचा मार्ग हा वसई पोलीस स्टेशन- पार नाका- खाऊ गल्ली अगरवाल गेट - येस बँक अंबाडी नाका -वसई वाहतूक शाखा कार्यालय- शाहीन ऑटो- बोळींज मस्जिद- जुना विवा कॉलेज- ओस्तवाल शाळा- तुळींज पोलीस ठाणे-विनायक हॉस्पिटल- रेंज नाका- यशोभारती सर्विस सेंटर ते आप्पा ग्राउंड असे होते.

सदर रॅली दरम्यान पोलीस ठाणे हद्दीतील शांतता समिती, मोहल्ला समिती सदस्य, पोलीस मित्र व सामान्य जनतेने रॅली दरम्यान धावणाऱ्या पोलीसांचा उत्साह वाढविला.








पोलीस आयुक्तालय
मीरा-भाईदर,वसई-विरार